# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.

**जिल्हा विशेष शाखा, सातारा**

९३, मल्हार पेठ, सातारा फोन नंबर ०२१६२-२३४२३१

Email – pidsb.satara@mahapolice.gov.in


क्रमांक:जिविशा-१/जिप-पंस निवडणूक/वाहतुक मार्गातीलबदल /२०२६- 93८ सातारा, दिनांक :०८/०२/२०२६

## महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३४ प्रमाणे अधिसूचना

ज्या अर्थी, माझ्या असे निदर्शनास आले आहे की, वडूज पोलीस ठाणे हद्दीत **सातारा जिल्हा परिषद व पंचायत समिती मतदार संघातील** खटाव प्रशासकिय कार्यालय, वडूज **येथे** दिनांक ०९/०२/२०२६ रोजी सकाळी ०७.०० वा. चे पासून मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.

दिनांक ०९/०२/२०२६ रोजी मतमोजणी प्रक्रियेदरम्यान मतमोजणीचे ठिकाणी वाहतुक कोंडी होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून खाली दर्शविले प्रमाणे वाहतुक व्यवस्था आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्या अर्थी मी, तुषार दोशी, पोलीस अधीक्षक,सातारा मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरुन छत्रपती शिवाजी महाराज चौक वडूज ते पुसेगांव रोड मुख्य रस्ता अक्षता मंगल कार्यालय वडूज या ठिकाणी दिनांक ०९/०२/२०२६ रोजी सकाळी ०५.०० ते १८.०० वाजेपर्यंत सदर रस्त्यावरील वाहतुकीच्या मार्गात खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

**१.छत्रपती शिवाजी महाराज चौक वडूज ते पुसेगांव रोड मुख्य रस्ता अक्षता मंगल कार्यालय वडूज पर्यंतचा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात येत आहे.**

**२. पुसेगांव वरुन येताना पुसेगांव रोड तेअक्षता मंगल कार्यालय वडूज ते शांताई पार्क ते पेडगांव रोड ते हुतात्मा हायस्कुल असा पर्यायी मार्ग तयार करण्यात आलेला आहे.**

**वरील वाहतुकीचा बदल दिनांक ०९/०२/२०२५ रोजी ०५.०० ते १८.०० वा. पर्यत राहील.**

**वरील सर्व मार्गावर रुग्णवाहीका, अग्निशमन वाहने, पोलीस दलाची वाहने व निवडणुक प्रक्रियेतील वाहने वगळुन इतर सर्व वाहनांच्या मार्गात बदल करणेत येत आहे.**

तरी वरील नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधीतांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

हा आदेश माझी स्वाक्षरी व शिक्क्यानिशी आज दि. ०८/०२/२०२६ रोजी काढण्यात आला आहे.

ठिकाण - सातारा

दिनांक - ०८/०२/२०२६

Superintendent of Police Satara

(तुषार दोशी) भापोसे

पोलीस अधीक्षक सातारा

**प्रत : माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी**

(१) जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,सातारा.

(२) सर्व दैनिक वृत्तपत्रे संपादक व प्रतिनिधी.

**प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी**

(१) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.

(२) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, सातारा जिल्हा.

Scanned with OKEN Scanner